विलास वैद्य यांची कविता

# एक सर्जनशोध

(माझ्या प्रयोगशील देशात)

संपादक : डॉ. कमलाकर चव्हाण



**Publication Number**

**567**

ISBN NO : 978-81-951082-7-5

| | |
|---|---|
| विलास वैद्य यांची कविता : एक सर्जनशोध<br>(माझ्या प्रयोगशील देशात)(संपादन) | **Vilas Vaidya Yanchi Kavita : Ek Sarjanshodh**<br>(Majhya Prayogshil Deshat) (Edition) |
| संपादक-- डॉ. कमलाकर चव्हाण<br>'शब्दगंध' वैष्णवीनगरी, तरोडा(खु.),नांदेड<br>मो : ९४२१३८१३५० | Dr. Kamlakar Chavan<br>'Shabdagandh' Vaishnavinagari<br>Torada (Kh.), Nanded<br>Mob : 9421381350 |
| प्रकाशक<br>**दत्ता डांगे**<br>इसाप प्रकाशन,<br>'कांचनब्रह्म'<br>१९०, सहयोगनगर<br>नांदेड - ४३१ ६०५<br>भ्र. ९८९००९९५४१ | Published By<br>**Datta Dange**<br>Esap Prakashan,<br>'Kanchanbramha'<br>190, Sahayog nagar<br>Nanded - 431 605<br>Mob : 9890099541 |
| मुद्रक<br>**आर्टी ऑफसेट प्रिंटर्स, लातूर** | Printing Press<br>**Arty Offset Printer's Latur** |
| **प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२१** | **First Edition : 26 January 2021** |
| सर्वाधिकार : **सौ. सुलभा वैद्य** | **© Sow. Sulbha Vaidya** |
| मुखपृष्ठ<br>**संतोष घोंगडे, पुणे** | Cover Design<br>**Santosh Ghongde, Pune** |
| आतील रेखाटने : **भ. मा. परसवाळे** | |
| अक्षरजुळणी : **सौ. कलावती घोडके**<br>**कृष्णा डी.टी.पी. आर्टस्, नांदेड** | **Type Setting : Sow. Kalavati Ghodke, Krishna D. T. P. Art's, Nanded**<br>Mob : 9545351820 |
| मूल्य : **२५० /- रुपये** | **Price :** Rs -250/- |

(या ग्रंथातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

## अनुक्रमणिका...


१. जागतिकीकरणानंतरच्या कालखंडातील महत्त्वाची कविता • डॉ. नागनाथ कोत्तापल्ले /१९

२. अनुभूतीचा श्रेष्ठ प्रत्यय देणारी कविता • डॉ. श्रीपाल सबनीस /२०

३. मनातला दाह आकाशापर्यंत पोहोचवणारी कविता • बाबाराव मुसळे / २२

४. अभिव्यक्तीच्या वेगळेपणाची कविता • भ. मा. परसवाळे / २३

५. आत्मनिष्ठ धारणांची कविता • प्राचार्य डॉ. किसन पाटील/२४

६. सुंदरतेचा गाव निर्माण करण्याचे सामर्थ्य असणारी कविता • डॉ. यशवंत पाठक / २६

७. कविता : वाचकमनाशी झोंबी घेते • डॉ. सुहासिनी कीर्तिकर / २८

८. 'माझ्या प्रयोगशील देशात': मूल्यभानाची कविता • प्रा. भगवंत क्षीरसागर / ३०

९. जागतिकीकरणानंतरच्या स्थित्यंतराचा अचूक वेध:'माझ्या प्रयोगशील देशात' • डॉ. जगदीश कदम / ३३

१०. अनाचाराशी युद्ध लढणारी तेजस्वी कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • डी. बी. जगत्पुरिया / ३७

११. वेदना-विद्रोहाचा व्यापक परीघ : 'माझ्या प्रयोगशील देशात' • डॉ. शत्रुघ्न जाधव / ४१

१२. 'माझ्या प्रयोगशील देशात': सामान्य वाचक स्वतःची भूमिका शोधतो आहे • अशोक अर्धापूरकर / ५४

१३. समकालीन वेदनांचे वास्तव दर्शन • डॉ. नानासाहेब सूर्यवंशी/ ६०

१४. समाजमनाला अंतर्मुख करणारी कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • डॉ. कमलाकर चव्हाण /६५

१५. 'माझ्या प्रयोगशील देशात'मधील अंतर्मुख चिंतनशीलता • प्रा. डॉ. सा. द. सोनसळे/७४

१६. विलास वैद्य यांच्या कवितेतील अल्पाक्षरत्व • प्रा. डॉ. पंडित अनंदराव शिंदे/८०

१७. हृदय हेलकावून सोडणारी कविता • सुधाकर तुकारामपंत कुलकर्णी/८४

१८. सत्यनिष्ठेला बळ देणारी कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • प्रा. जयप्रकाश पाटील / ८७

१९. 'माझ्या प्रयोगशील देशात' : कोलाहल मनामनांचा • प्रा. डॉ. व्यंकटी पावडे / ९२

२०. समाजरचनेच्या पुनर्बांधणीचा आशावाद : 'माझ्या प्रयोगशील देशात' • डॉ. महेश मंगनाळे / ९८

२१. अस्वस्थ वर्तमानाची कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • प्रा. खंडेराव भिसे / १०७

२२. परिवर्तनाची आस असलेली कविता : 'माझ्या प्रयोगशील देशात' • राजू रणवीर / ११२

'माझ्या प्रयोगशील देशात' मधील निवडक कविता – / ११७

# विलास वैद्य यांच्या कवितेतील अल्पाक्षरत्व

प्रा. डॉ. पंडित आनंदराव शिंदे

प्रा. विलास वैद्य गेल्या चार दशकापासून सातत्याने काव्यलेखन करीत आहेत. सामाजिक जाणिवा व्यक्त करणे त्यांचा स्थायीभाव आहे. साठोत्तरी कालखंडात समाजात सर्वत्र आढळणारी विसंगती त्यांनी मोठ्या काव्यात्मकरित्या आपल्या कवितेत मांडली आहे. त्यांच्या 'गलफ', 'आलाप', 'माझ्या प्रयोगशील देशात' या तिन्ही काव्यसंग्रहात सामाजिक आशयाचा पट सतत विस्तारत व उंचावत गेला आहे हे गौरवाने नमूद करावेसे वाटते.

'माझ्या प्रयोगशील देशात' या काव्यसंग्रहात एकूण सत्तर कविता आहेत. या कवितांची शीर्षके काढली तर सामाजिक जाणिवांची एक उत्तम दीर्घ कविता आपणास अनुभवण्यास मिळते. सद्यकालीन परिस्थितीत समाजकारण, धर्मकारण, राजकारण, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत वाईट प्रवृत्तीने घेरले आहे. त्यांचा एक धावता चलपट या संग्रहातून पाहावयास मिळतो. एकूणच जीवनव्यवहारात चालू असलेले ढोंग, बडेजावपणा, भांडवलशाही वृत्ती, कटकारस्थान यात अडकलेला 'निष्पाप माणूस' या कवितांचा प्रमुख विषय आहे आणि या संघर्षातून सामान्य माणसाला मुक्त करणे हा प्रा. वैद्य यांच्या काव्यनिर्मितीमागचा प्रांजळ हेतू आहे, असे मला वाटते.

साठोत्तरी कालखंडात एकूणच मराठी कवितेत आमूलाग्र बदल झाला. सामान्य माणसांचे जीवन व त्यांच्या हृदयातला आर्त हुंकार सदर कवितेतून सातत्याने व्यक्त होत राहिला. यातील बहुसंख्य कवींनी आपली लेखनशैली आविष्कारपद्धती व भाषेमध्ये नानाविध प्रयोग केले. त्यापुढील म्हणजे १९८० च्या काळातील निवडक कवींमध्ये प्रा. विलास वैद्य यांच्या नावाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

एकूणच साहित्यविश्वात कथा, कादंबरी, नाटक, ललित गद्य इत्यादी प्रकारापेक्षा 'कविता' हा साहित्यप्रकार भिन्न आहे. त्यात प्रामुख्याने काव्यात्मकता, चित्रात्मकता,



विलास वैद्य

सच्चाईनं मंतरलेल्या स्वतःच्या आपल्या आवाजाची कविता विलास वैद्य यांनी लिहिली; ही गोष्ट सत्य आहे. गलबला न करता किंवा आदळआपट न करता समंजस स्वरांची त्यांची कविता मराठवाडी मातीचं सौंदर्य दृढ करते. वैद्यांकडे आतले आणि बाहेरचे असे दोन वागणे नाही. त्यांचे बिंब जसे वर्तनात आढळते तसेच सर्जनातही आढळते. अशा विलास वैद्य यांच्या प्रातिभिक काव्यप्रवासाचा सर्जनशोध म्हणजे हे नेटके संपादन होय.

'माझ्या प्रयोगशील देशात' या त्यांच्या काव्यसंग्रहास केंद्रवर्ती ठेवत नव्या जुन्या वेगवेगळ्या चिंतकांनी विलास वैद्य यांच्या काव्याचे बहुपेलू इथे उलगडून दाखविलेले वाचावयास मिळतात. डॉ. कमलाकर चव्हाण या अभ्यासू तरुण संपादकाने सिद्ध केलेले हे संपादन मौलिक याकरिता म्हणायला हवे की, डॉ. कमलाकर चव्हाण हे केवळ प्राध्यापक नाहीत तर समकालीन एकंदरीतच साहित्य तसेच भाषेच्या संस्कृतीकडे साक्षेपी आणि निरोगी नजरेनं पाहण्याचा दिलदारपणा त्यांच्याकडे आहे. म्हणूनच, त्यांच्या या संपादनाला जास्त महत्त्व आहे.

**- डॉ. केशव सखाराम देशमुख**

ISBN 978-81-951082-7-5